नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक ०८/१०/२०२२ (शनिवार)**

**(सकाळ)**

---

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूध गुन्हा नोंद

**पो.स्टे. पारशिवनी** :- अंतर्गत १५ कि.मी. अंतरावरील मौजा पेंच डॅम जवळ येथे दिनांक ०७/१०/२०२२ चे ०४.०० वा. दरम्यान एमएच- ३६/झेड- ६३४० क्रमांकाचा ट्रैक्टर मुंडा व एम.एच-३६/झेड-२०८२ क्रमांकाची ट्रॉलीचा चालक आरोपी नामे- शालिक भाउराव तिळगाम, वय ४० वर्ष, रा. परसोडी ता. पारशिवनी याने आपले ताब्यातील वाहनात विना परवाना अवैधरित्या १ ब्रास रेती किं. ५,०००/- रू. भरून वाहतुक करतांना मिळुन आला. वाहनासह एकुण ६,५५,०००/-रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस शिपाई रूपेश राठोड पो.स्टे. पारशिवनी यांच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री पळनाटे मो.क्र. ७३८७०८६१७८ हे करीत आहे.

## जबर दुखापत

**पो.स्टे. कुही** :- अंतर्गत ३५ कि. मी. अंतरावरील मौजा वडद शेतशिवार येथे दिनांक ०७/१०/२०२२ ते १४.०० वा. सुमारास फिर्यादी नामे- भोला नानाजी वाघाडे, वय ६५ वर्ष, रा. खापरी, ता. उमरेड, जि. नागपुर हा त्याने केलेल्या शेतात डवरण करीत असतांना ०३ अनोळखी इसम वय अंदाजे २५ ते ३० वर्ष वयोगटातील शेतात येउन फिर्यादीला जवळ बोलावुन 'तु जमीन का बरं केली, पडीत राहते तर राहु दयायची' असे म्हणुन दोघांनी हात पकडले व एकाने त्यांच्या जवळील चाकु काढुन फिर्यादीच्या दोन्ही पायाच्या मागच्या बाजुला वार करून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम ३२६, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि. शिवाजी बोरकर, मो.नं. ८३२९१३०४५८ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**